**महाराष्ट्र शासन**

दुरध्वनी क्रं. - 02462-244474, 234504 नियंत्रण कक्ष क्रं. - 02462-234720

फॅक्स क्रं. - 02462-235103 E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com


जा.क्रं./ प्रेस नोट/301/पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड / 2024 / दिनांक : 28/08/2024

## 1)घरफोडी :–

**मुदखेड :–** दिनांक 26.08.2024 रोजी 07.00 वा. ते दिनांक 27.08.2024 रोजी 06.00 वा. चे दरम्यान, **इसार पेट्रोल पंप जवळ मुगट, ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे रोजच्याप्रमाणे आपले हॉटेल बंद करून घरी जेवण करण्यासाठी मुगट येथे गेले व तब्येत बरी नसल्याने घरीच झोपी गेले व दुसऱ्या दिवशी सकाळी हॉटेल उघडण्यासाठी गेले असता हॉटेलचे शेटर खुले दिसले हॉटेलमध्ये जावून पाहणी केली असता गल्यातील नगदी, एक फ्रिज, गॅस शेगडी, दोन सिलेंडर, प्लास्टीकच्या खुर्च्या असा एकुण 25,000/–रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी संभाजी नारायण पिन्नलवाड, वय 40 वर्षे, व्यवसाय हॉटेल चालक रा. मुगट ता. मुदखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुदखेड** गुरनं 186/2024 कलम 331(4),305 भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2187 आलेवार, मो. नं. 9158756087** हे करीत आहेत.

## 2)मोबाईल चोरी :–

**वजिराबाद :–** दिनांक 26.08.2024 रोजी 17.00 वा. ते 18.00 वा. चे दरम्यान, **अंजली मॅचिंग सेंन्टर दुकाना समोर वजिराबाद, नांदेड येथे,** यातील फिर्यादी व त्यांची पत्नी यांनी नमुद ठिकाणी दुकाना समोर आपली स्कुटी लावून स्कुटीच्या डिक्कीमध्ये फिर्यादीचा वन प्लस व त्यांचे पत्नीचा रेडमी नोट 13 प्रो मोबाईल एकुण किंमती 53,000/–रूपयाचे मोबाईल डिक्कीत ठेवून खरेदी साठी मार्केट मध्ये गेले असता डिक्कीत ठेवलेले दोन मोबाईल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी शंकर मोहनराव याबाजी, वय 38 वर्षे व्यवसाय सरकारी नौकरी रा. नवीन कौठा, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 428/2024 कलम 303(2) भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/11 सोनटक्के, मो.नं. 8421435353** हे करीत आहेत.

## 3)चोरी :–

**नायगाव :–** दिनांक 27.08.2024 रोजी 11.00 वा. चे सुमारास, **बैल बाजार नायगाव ता. नायगाव जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी व त्यांचे सोबतचे ईतर व्यक्ती हे मा. खासदार श्री बळवंतराव चव्हाण साहेब यांचे अंत्यविधी कामी बैल बाजार नायगाव येथे गेले असता यातील नमुद दोन आरोपीतांनी अत्यंविधीचे ठिकाणी लोकांचे गर्दीचा फायदा घेवून फिर्यादी व ईतर चार व्यक्तींचे गळयातील एकुण 10 तोळे 8 ग्रॅम वजनाचे पाच सोन्याचे चैन एकुण किंमती 4,32,000/–रूपयाचे चोरून नेले. वगैरे **फिर्यादी बालाजी धोंडीबा गादेवार, वय 57 वर्षे व्यवसाय व्यापार किराणा दुकान रा. वसंतनगर नायगाव ता. नायगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नायगाव** गुरनं 216/2024 कलम 303(2), 3(5) भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/1133 पेदे, मो.नं. 8421435353** हे करीत आहेत.

## 4)चोरीचा प्रयत्न :–

**कुंटूर :–** दिनांक 26.08.2024 रोजी 23.00 वा. ते दिनांक 27.08.2024 रोजी 04.00 वा. चे दरम्यान, **जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक शाखा, कुंटूर ता. नायगाव जि. नांदेड येथे,** यातील अज्ञात आरोपीने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक लिमिटेड शाखा कुंटूर चे मेन गेट कडी व दरवाजाचे कुलूप तोडून बॅकेत प्रवेश करून कॅश रूम मधील टेबल फॅन तोडला व चोरी करण्याचे उद्देशाने तिजोरी फोडण्याचा प्रयत्न केला. वगैरे **फिर्यादी गणेश संभाजी लोंडगे, वय 56 वर्षे व्यवसाय नौकरी व्यवस्थापक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक लिमिटेड शाखा कुंटूर रा. मांडणी ता. नायगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कुंटूर** गुरनं 167/2024 कलम 303(2), 3(5) भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री खोले, मो.नं. 9823210420** हे करीत आहेत.

## 5)मो.सा.चोरी :–

**वजिराबाद :–** दिनांक 23.08.2024 रोजी 10.00 वा. ते 20.00 वा. चे दरम्यान, **गांधी पुतळयाचे पाण्याचे टाकी जवळील मैदानात वजिराबाद, नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो होंडा पॅशन प्रो कंपनीची मोटार सायकल क्रं. एमएच.–26/एजी–0587 किंमती 20,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी मोहम्मद युनुस मोहम्मद ईकबाल, वय 50 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. गाडीपुरा, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 429/2024 कलम 303(2) भारतीय न्याय संहिता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1842 कत्ते, मो.नं. 8888807574** हे करीत आहेत.

## 6)गंभीर दुखापत :–

**धर्माबाद :–**दिनांक 27.08.2024 रोजी 07.30 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरासमोर जारीकोड ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील नमुद फिर्यादी यांचे भावाचा जावई याने माझे पत्नीला तू कसे काय घेवून आलास असे म्हणाला असता फिर्यादी याने रक्षाबंधन साठी घेवून आलो आहोत रक्षाबंधन झाल्यानंतर तुमच्या घरी आनुन सोडतो असे फिर्यादी म्हणाला असता आरोपीने अश्लिल शिवीगाळ करून त्याच्या हातातील लाकडी काठीने फिर्यादीचे हातावर, पाठीवर व पायावर जोरात मारून हातास फॅक्चर केले व गंभीर दुखापत केली व साक्षीदार भांडण सोडवण्यास आले असता त्यांना पण मारहाण करून खांदयावर चावा घेवून जखमी केले व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी नागनाथ शंकरराव रावळ, वय 61 वर्षे, व्यवसाय सेवानिवृत्त रा. जारीकोड ता. धर्माबाद जि. नांदेड,** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरनं 256/2024 कलम 118(2),296,115(2)(3) भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2022 मठपती, मो.नं. 8390589720** हे करीत आहेत.

## 7)अवैध रेती चोरी :–

**लिंबगाव :–** दिनांक 27.08.2024 रोजी 01.30 वा. चे सुमारास, **मौजे लिंबगाव ते नांदेड जाणारे रोडवर पाखार्नी शिवारात ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररीत्या टाटा कंपनीचा हाईवा क्रं. एमएच.–26/बीई–5066 किंमती 1,50,000/–रूपयाचा मध्ये पाच ब्रास रेती किंमती 25,000/–रूपयाची चोरटी विक्री करण्याच्या उदेशाने वाहतुक करीत असतांना मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/261 राजेश सोगाजी घनुर, ने. पोस्टे लिंबगाव** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लिंबगाव** गुरनं 122/2024 कलम 303(2),3(5) भारतीय न्याय संहीता–2023 सह कलम 48 (7) महाराष्ट्र जमीन महसुल अधि 1966 प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2941 मोरे, मो.क्रं. 9857717259** हे करीत आहेत.

## 8)शासकीय कामात अडथळा :–

**बिलोली :–** दिनांक 27.08.2024 रोजी 12.10 वा. चे सुमारास, **नवीन बसस्टॅड बिलोली ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी फिर्यादी हा शासकीय काम करीत असताना आरोपीतांनी माझे भावाला नांदेड येथे बस मधुन का उतरविले याचा राग मनात धरून फिर्यादीच्या शर्टच्या कॉलरला पकडून मारले व जमीनीवर पाडून पोटावर बसून फिर्यादीची दाढी पकडून मारहाण केली व फिर्यादीचा सहकारी यांना पण गालावर मारहाण केली व मी बिलोलीचा डॉन आहे तुम्हाला कोठे तक्रार करायची ते करा असे म्हणुन धमकी दिली व शिवीगाळ करून शासकीय कामात अडथळा निर्माण केला. वगैरे **फिर्यादी शिवचरण सिंग हिरासिंग परमार, वय 42 वर्षे, व्यवसाय बस चालक बिलोली आगार रा. गुरूव्दारा गेट नं. 1 हनुमान मंदिराजवळ नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बिलोली** गुरनं 211/2024 कलम 132,121(1),352,351(2),351(3),3(5),56 भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री शिंदे, मो.क्रं. 9096955912** हे करीत आहेत.

## 9)आत्महत्येस प्रवृत्त केले :–

**किनवट :–**दिनांक 09.08.2012 ते दिनांक 23.08.2024 रोजी 00.32 वा. चे दरम्यान, **मयताचे राहते घरी शाहुनगर गोकुंदा किनवट ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे योगिता दत्ता तुमराम, वय 44 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. शाहुनगर किनवट ता. किनवट जि. नांदेड** यांना यातील नमुद आरोपीने वारंवार वेगवेगळया कारणावरून संशय घेवून शारिरीक व मानसिक छळ करून त्रास दिल्याने त्रासाला कंटाळुन यातील मयत हिने अंगावर पेट्रोल टाकुन जाळुन घेवून आत्महत्या केली. यातील नमुद आरोपीने आत्महत्येस प्रवृत्त केले. वगैरे **फिर्यादी संतोष शंकरराव येडमे, वय 46 वर्षे, व्यवसाय कंत्राटी क्लार्क रा. अंबिका नगर दारव्हा ता. दारव्हा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरन 263/2024 कलम 108,115(2), 3(5) भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री झाडे, मो.नं. 8668842897** हे करीत आहेत.

## 10)विवाहीतेचा छळ :–

**अर्धापूर :–**दिनांक 14.10.2024 ते दिनांक 24.12..2024 चे दरम्यान, **फिर्यादीचे सासरी नावघाट, नांदेड ह.मु. तालाब गल्ली अर्धापूर ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद सहा आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस दहेज मध्ये काहीच घेवून आली नाहीस असे म्हणुन फिर्यादीस म्हणुन शिवीगाळ व मारहाण करून शारिरीक व माणसीक छळ केला व जिवे मारण्याची धमकी दिली व घराचे बाहेर हाकलून दिले. वगैरे **फिर्यादी 25 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 471/2024 कलम 498(अ),504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन, **तपास पोहेकॉ/1839 कांबळे, मो.क्रं. 9823342366** हे करीत आहेत.

## 11)जुगार :–

**अर्धापूर :–**दिनांक 26.08.2024 रोजी 22.10 वा. चे सुमारास, **मौ. निमगाव ता. अर्धापूर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आठ आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररीत्या मेन बाजार नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी, मोबाईल व मोबाईल टॅब असा एकुण 1,41,720/–रूपयाचे जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/1074 रूपेश कुमारशंकरराव नरवाडे, ने. पोस्टे अर्धापूर** यांनी दिलेल्या फिर्यादवरून **पोस्टे अर्धापूर** गुरनं 470/2024 कलम 12(अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री भोसले, मो.नं. 9890595618** हे करीत आहेत.

## 12)प्रोव्हिबीशन :–

**1)इतवारा :–**दिनांक 27.08.2024 रोजी 10.45 वा. चे सुमारास, **रेखा संभाजी गायकवाड यांचे घरासमोरील सार्वजनिक रोडवर शांतीनगर, नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी व विदेशी दारू एकुण किंमती 3430/–रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उदेशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/436 एकनाथ सखाराम मोकले, ने. पोस्टे इतवारा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 324/2024 कलम 65(ई), मप्रोका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/802 वाजीद, मो.नं. 8975992449** हे करीत आहेत.

**2)तामसा :–**दिनांक 27.08.2024 रोजी 16.40 वा. चे सुमारास, **मौजे चिकाळा पाटी जवळ धाब्यामध्ये ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 2030/–रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उदेशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री डुडुळे, ने. पोस्टे तामसा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे तामसा** गुरनं 101/2024 कलम 65(ई), मप्रोका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री डुडुळे, मो.नं. 9022037761** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड